आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३०वाजता
७ जून २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- देशभरात बकरी ईदचा उत्साह, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांकडून देशवासियांना शुभेच्छा

- रशियानं युक्रेनच्या खारकिव्ह शहरावर केलेल्या हल्ल्यात तीन ठार, २१ जण जखमी

आणि

- फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात आज अरीना साबालेंका आणि कोको गॉफ यांच्यात लढत

**<><><><>**

शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. एनडीए सरकारच्या ११ वर्षांच्या कार्यकाळात कष्टकरी शेतकऱ्यांची सेवा करण्याची संधी मिळाली, हे सरकारचं भाग्य असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

गेल्या ११ वर्षांत, विविध सरकारी उपक्रमांमुळे शेतकऱ्यांची समृद्धी वाढली असून, कृषी क्षेत्रात परिवर्तन घडून आलं. तसंच मातीचं आरोग्य आणि सिंचन यासारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केल्यामुळे त्याचे चांगले परिणाम दिसत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. आगामी काळातही शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सरकारचे प्रयत्न सुरु राहतील असं आश्वासन त्यांनी दिलं.

**<><><><>**

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण ही तत्व अंगीकारून, केंद्र सरकारने गेल्या दशकभरात विविध क्षेत्रांमध्ये केलेल्या प्रयत्नांमुळे देशात उल्लेखनीय परिवर्तन घडून आलं आहे. स्वच्छ ऊर्जा आणि हवामान बदलावरचं जागतिक नेतृत्व हे यापैकी एक आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**- होल्ड- व्हाइस कास्ट -**

भारताने स्वच्छ ऊर्जेच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली असून, हवामान बदलावरच्या कृतीमध्ये जागतिक नेता म्हणूनही उदयाला आला आहे. 'अक्षय ऊर्जा आकर्षण' देशांच्या यादीत भारतानं ७ स्थान मिळवलं असून, जागतिक स्वच्छ ऊर्जा क्षेत्रातला देशाचा वाढता प्रभाव यामधून स्पष्ट होत आहे.

राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशन, विस्तारित जैवऊर्जा कार्यक्रम आणि इलेक्ट्रिक मोबिलिटीकडे वाढता कल, यासारखे उपक्रम शून्य-कार्बन उत्सर्जन अर्थव्यवस्थेचा पाया रचत आहेत. स्वच्छ ऊर्जेचा हा प्रयत्न भारताच्या जागतिक हवामान बदलावरच्या नेतृत्वाशी जोडला गेला आहे.

त्याशिवाय, आंतरराष्ट्रीय हवामान बदल सहकार्याला आकार देण्यात भारतानं सक्रिय भूमिका बजावली आहे. भारत आंतरराष्ट्रीय सौर आघाडी आणि आपत्ती प्रतिरोधक पायाभूत सुविधा गटाचा संस्थापक सदस्य आहे. हे व्यासपीठ विशेषतः ग्लोबल साऊथ मध्ये स्वच्छ ऊर्जेची उपलब्धता आणि आपत्ती हाताळणीमधल्या लवचिकतेला प्रोत्साहन देतं.

<><><><>

देशातल्या सक्रिय कोरोना रुग्णांची संख्या आज ५ हजार ७५५ झाली असून ४ जणांचा मृत्यू झाला आहे. महाराष्ट्र, केरळ, मध्य प्रदेश आणि तमिळनाडूमध्ये प्रत्येकी एका रुग्णाचा मृत्यू झाला. केरळमध्ये रुग्णांची संख्या वाढत असून एका दिवसात १२७ नवीन रुग्ण आढळून आले आहेत. गुजरातमध्ये १०२ आणि महाराष्ट्रात २९ नवीन रुग्णांची नोंद झाली आहे.

<><><><>

छत्तीसगडमधल्या बिजापूर इथं आज सुरक्षा दलांच्या कारवाईत दोन माओवादी मारले गेले. गेल्या ३ दिवसांपासून ही कारवाई सुरू आहे. मृत माओवाद्यांची ओळख अद्याप पटली नसून त्यांच्याकडून स्वयंचलीत शस्त्रं जप्त करण्यात आली आहेत.

मागच्या दोन दिवसांत संरक्षण दलांनी सुधाकर आणि भास्कर या दोन माओवाद्यांना ठार केलं. सुधाकर हा भाकप माओवादी या बंदी असलेल्या पक्षाचा केंद्रीय समिती सदस्य होता. त्याच्यावर एक कोटी रुपयांचं बक्षिस होतं. तर भास्कर हा स्पेशल झोनल कमिटीचा सदस्य असून त्याच्यावर ४५ लाख रुपयांचं बक्षिस होतं.

<><><><>

बेंगळुरूमध्ये झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणी कर्नाटक पोलिसांनी या सोहळ्याच्या आयोजनात त्रुटी ठेवल्याचा आरोप करत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू फ्रँचाइजी, कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनचे काही सदस्य आणि इतर काही जणांविरोधात नव्यानं FIR दाखल केला आहे.

दरम्यान, या कार्यक्रमाच्या आयोजनात निष्काळजीपणा केल्याचा आरोप करत विरोधी पक्षांनी कर्नाटक राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

**<><><><>**

देशभर आज पारंपरिक उत्साहाने आणि श्रद्धेने साजरा केल्या जात असलेल्या ईद-ऊल-अझहा अर्थात बकरी ईद निमित्त राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्री यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. मुस्लिम बांधवांनी आज ईदगाह आणि मशिदीत जाऊन ईद निमित्त नमाज अर्पण केले आणि परस्परांना शुभेच्छा दिल्या. राजधानी दिल्ली मध्ये जामा मशिद, फतेहपुरी मशिद आणि शाही ईदगाह इथं ईदचा मुख्य सोहळा पार पडला.

ईदचा सण हा त्याग, श्रद्धा आणि मानवी मूल्यांचं प्रतीक असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. हा सण समाजात एकता, प्रेम आणि बंधुभावाचा प्रसार करतो असं त्या म्हणाल्या.

ईदचा सण सर्वांना त्याग, सामर्थ्य, आणि औदार्याच्या शक्तीची जाणीव करून देतो असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. ईद-ऊल-अझहाच्या माध्यमातून केल्या जात असलेल्या निःस्वार्थी आणि सेवेच्या मूल्यांमुळे देशाची लोकशाही रचना समृद्ध होत असून, आपल्या वैविध्यपूर्ण समाजाचे बंध अधिक दृढ होतात असं ते म्हणाले .

या सणामुळे समाजात सुसंवादाची प्रेरणा आणि शांतीचे बंध अधिक दृढ होतात असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी सर्व नागरिकांना सुदृढ आरोग्यासाठी आणि समृद्धीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><>**

भारतानं तीव्र गरिबी निर्मुलनात लक्षणीय प्रगती केली असून, २०११-१२ ते २०२२-२३ या कालावधीत देशातले सुमारे २७ कोटी नागरिक तीव्र गरिबीतून बाहेर आल्याचं जागतिक बँकेच्या नुकत्याच जाहीर झालेल्या आकडेवारीत म्हटलं आहे. देशाचा

तीव्र गरिबीचा दर २०११-१२ मध्ये २७ पूर्णांक १ दशांश टक्के इतका होता. २०२२-२३ मध्ये तो ५ पूर्णांक ३ दशांश टक्क्यावर आल्याचं यात म्हटलं आहे. सुमारे १८५ रुपयांपेक्षा कमी दैनंदिन खर्च असलेल्या व्यक्ती जागतिक बँकेच्या व्याख्येनुसार तीव्र गरिबीच्या श्रेणीत येतात.

महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये ही प्रगती नोंदवली गेली असून, गेल्या दशकभरात गरिबी कमी करण्यात या राज्यांनी दोन तृतीयांश वाटा उचलला आहे. तसंच देशाच्या ग्रामीण आणि शहरी, दोन्ही भागात गरिबीमध्ये घट दिसून आल्याचं यात म्हटलं आहे.

आरोग्य, शिक्षण आणि राहणीमान या घटकांसह बहुआयामी गरिबी कमी करण्यातही भारताने चांगली सुधारणा केल्याचं जागतिक बँकेची आकडेवारी सांगते.

<><><><>

युक्रेनच्या खारकिव्ह शहरावर रशियानं केलेल्या ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यात किमान ३ जण ठार, तर २१ इतर जखमी झाले आहेत. गेल्या काही आठवड्यांतला रशियाचा हा सर्वात मोठा हल्ला आहे. यात १८ इमारती आणि १३ घरांचं नुकसान झालं आहे.

<><><><>

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत महिला एकेरीचा अंतिम सामना आज अग्रमानांकित अरीना साबालेंका आणि दुसऱ्या क्रमांकावर असलेली कोको गॉफ यांच्यात रंगणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी साडेसहा वाजता सामना सुरू होईल.

दरम्यान, पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत काल गतविजेत्या कार्लोस अल्काराजचा प्रतिस्पर्धी लॉरेंझो मुसेटी यानं दुखापतीमुळे सोडला, त्यामुळे अल्काराज अंतिम फेरीत दाखल झाला. तर दुसऱ्या सामन्यात अग्रमानांकित यानिक सिनर यानं नोव्हाक जोकोविचचा थेट सेट्समध्ये पराभव केला.

मिश्र दुहेरीच्या अंतिम फेरीत काल सारा एरानी आणि आंद्रेया वावासोरी या जोडीनं अमेरिकेच्या टेलर टाऊनसेंड आणि एव्हान किंग या जोडीवर ६-४, ६-२ असा सहज पराभव करून अजिंक्यपद पटकावलं.

<><><><>

अग्रमानांकित बुद्धिबळपटू मॅग्नस कार्लसन यानं नॉर्वे चेस २०२५चं विजेतेपद पटकावलं आहे. या स्पर्धेतलं हे त्याचं सातवं विजेतेपद आहे. विद्यमान विश्वविजेता आणि त्याचा कडवा प्रतिस्पर्धी भारताचा ग्रँडमास्टर डी. गुकेश खेळाच्या शेवटच्या टप्प्यावर अडखळल्याने कार्लसनला त्याचा फायदा झाला. क्लासिक विभागात अंतिम सामन्यात भारताच्या अर्जुन एरिगैसी यानं कार्लसनला बरोबरीत रोखलं होतं. तर स्पर्धेचं जेतेपद पटकावण्यासाठी गुकेशला ग्रँडमास्टर फॅबियानो कॅरुआना याच्याविरुद्धचा सामना जिंकणं गरजेचं होतं. मात्र या सामन्यातल्या शेवटच्या टप्प्यावर गुकेशची खेळी चुकल्याने त्याला पराभव पत्करावा लागला.

**<><><><>**

भारताचा ग्रँडमास्टर अरविंद चिदंबरम यानं अर्मेनियात झालेल्या सहाव्या स्टीपन अवाग्यान स्मृती बुद्धिबळ स्पर्धेच्या जेतेपदावर नाव कोरलं आहे. नऊ फेऱ्यांनंतर अरविंद आणि त्याचा प्रतिस्पर्धी ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंद हे दोघेही बरोबरीत होते, मात्र टायब्रेकमध्ये अरविंद विजेता ठरला.

**//<><><><>//**